# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मेट्रो महा कार्ड आता मोफत
## रु.200 टॉप-अपवर कार्ड पूर्णपणे मोफत
## नागपूर मेट्रोचा उपक्रम 15 सप्टेंबरपर्यंत




नागपूर: आपण महा कार्ड आता पूर्णपणे मोफत मिळवू शकता. होय, अगदी मोफत.नागपूर मेट्रोने आपल्या प्रवाशांना सुलभ आणि किफायतशीर प्रवासासाठी नेहमीच नव-नवीन उपाययोजना केल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून महा मेट्रो नागपूरकडून महा कार्डसाठी लागू असणाऱ्या शुल्कावर १००% सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केवळ रु.200 चा टॉप-अप करून आपण हे महा कार्ड मोफत मिळवू शकता.

या उपक्रमाची तत्काळ अंबलबजावणी होत असून 15 सप्टेंबर 2025 पर्यंत लागू असणार आहे. हे कार्ड पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. हे महा कार्ड स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या सहकार्याने जारी करण्यात आले असून, सामान्य प्रवाशांसाठी मेट्रो भाड्यावर १०% सवलत आणि विद्यार्थ्यांसाठी ३०% सवलत दिली जाते.

- आत्तापर्यंत १,१३,९०० पेक्षा अधिक महा कार्ड्स विकण्यात आली आहेत.

महा कार्डच्या वापरामुळे प्रवाशांना तिकीट खरेदीसाठी रांगेत थांबण्याची गरज राहत नाही, फक्त AFC गेटवर टॅप करून प्रवेश व निर्गमन करता येतो. तसेच, या पद्धतीत प्रत्यक्ष तिकीटची आवश्यकता नसते, त्यामुळे कागदाची बचत होऊन पर्यावरण रक्षणातही हातभार लागतो.

महा कार्डचा सहज आणि सोपा वापर हीच त्याची लोकप्रियता असल्याचे कारण आहे. यामुळे नागपूरकरांसाठी मेट्रो प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि विद्यार्थ्यांसाठी अनुकूल बनतो.महा मेट्रो नागपूर नागपूरकरांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करत असून रु.200 च्या टॉप-अपवर मोफत महा कार्ड मिळवा. तपशीलांसाठी आणि कार्ड मिळवण्यासाठी आपल्या जवळच्या मेट्रो स्थानकाला भेट द्या.